# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE REACHING NATIONS

*India's National Spiritual Newspaper*

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXVI    YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2024 AUGUST    No. 07


### पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

स्तोत्र ८५:१-९

१. हे परमेश्वरा; तूं आपल्या देशावर प्रसन्न झाला आहेत, तू याकोबाला बंदिवासांतून परत आणिले आहे.

२. तूं आपल्या लोकांच्या अधर्माची क्षमा केली आहे; त्यांच्या सर्व पापांवर पांघरुण घातले आहे.

३. तूं आपला सर्व क्रोध आवरिला आहे; तूं आपल्या कोपाची तीव्रता सोडून दिली आहे.

४. हे आमच्या उद्धारक देवा, आम्हांस परत आण; आणि आम्हांवरील आपला रोष नाहीसा कर.

५. तूं आम्हांवर सर्वकाळ कोपलेला राहणार काय? पिढ्यानपिढ्या तूं क्रोध चालू ठेवणार काय?

६. तुझ्या लोकांनी तुझ्या ठायी हर्ष पावावा म्हणून तूं आमचे पुनरुज्जीवन करणार नाहीस काय?

७. हे परमेश्वरा तुझ्या दयेचा आम्हांस अनुभव येऊ दे व तूं सिद्ध केलेले तारण आम्हांस दे.

८. परमेश्वर देव काय बोलेल ते मी ऐकून घेईन; कारण तो आपल्या लोकांशी व आपल्या भक्तांशी क्षेमकुशलाचें भाषण करील मात्र त्यांनी मूर्खपणाकडे पुन: वळू नये.

९. त्याचे भय धरणाऱ्यांना त्याने सिद्ध केलेले तारण खरोखर समीप असते; यासाठी की आमच्या देशांत वैभव नांदावे.

# अडखळण मोडून काढणारा परमेश्वर बाल-परासीम

THE LORD OF BREAKTHROUGHS! **BAAL PARAZIM!** (2 samuel 5:20)

*मानद् प्रमुख संपादक, रेव्ह. ॲन्जेलीन सेल्वाकुमारी*



**एको ऑफ हिज कॉलच्या** माझ्या सर्व विस्तारीत कुटुंबाना शुभेच्छा. या पानांमधून तुम्हा सर्वांशी एकत्र जोडले जाण्यात नेहमीच आनंद वाटतो. उन्हाळा जवळ येत चाललेला असताना, आपण एक नव्या ऋतुत-मोसमात पाऊल टाकीत आहोत. प्रत्येक ऋतुला त्याचे एक अद्वितीय सौंदर्य असते. वाढीसाठी आपल्याला उष्णतेची आणि पर्जन्य असे दोन्ही गरजेचे आहेत. बायबल (उपदेशक ३:११) या वचनात शिकविते, **"देवाने आपआपल्या समयी हर एक वस्तु सुंदर बनविली आहे."** शलमोनाने म्हटल्या प्रमाणे भूतलावर सर्वांचा काही उचित असा समय असतो. मला ठाऊक नाहि, तुम्ही या वर्षात आजपर्यंत कोणता मोसम अनुभवला आहे; परंतु लक्षात ठेवा उत्तम तो अद्याप यावयाचा आहे. देवाच्या अभिवचनांचा स्विकार करणे हि महत्त्वाची बाब आहे. पुष्कळदा देवाच्या अभीवचनांची आम्हाला जाणीव असते; परंतु

(...पान ३ वर)




एको ऑफ हिज कॉल    *पाच मिनिटांचा संदेश*

**यू ट्युब ख्रिश्चन चॅनल**

**पास्टर सॅम सेल्वा राज**

**यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी**

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

Every day – From 2.00 A.M.

प्रतिदिनी - पहाटे पाच वाजता    रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

# ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)



REACHING NATIONS

## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



**आमचे कार्याविषयीचे धोरण**

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


**HON. EDITOR-IN-CHIEF**
Rev. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.

**HON. MANAGING EDITOR**
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

**GENERAL MANAGER**
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM., MBA.

**ADMINISTRATION**
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)

**EDITORIAL BOARD**
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran



**EDITOR, PUBLISHER & PRINTER**
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858

**E.MAIL**
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

**WEBSITES**
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

**YOUTUBE CHANNEL**
Echo of His Call


**"देवाचा धन्यवाद होवो; त्याने माझी पार्थना अवमानिली नाही, आपली मजवरची दया त्याने काढून घेतली नाही." (स्तोत्र ६६:२०)**

अति प्रिय बंधुंनो आणि बहिणीनों!

तुम्हां सर्वांना आणि तुमच्या सर्व प्रियजनांना, आम्ही **एको ऑफ हिज कॉल** मुख्यालयातून आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या नामात शुभेच्छा व्यक्त करीत आहोत.

आम्ही तुम्हाला सांगू इच्छितो की, खरोखर तुम्ही आमच्यासाठी विशेष असे आहात १९६९ साली **एको ऑफ हिज कॉल**ची सुरुवात झाली. तेव्हा पासून तुम्ही तुमचे आई-वडील, आणि आजी-आजोबा यांच्यासह आमच्या आत्मिक प्रवासात सहभागी झाला. या सर्व वर्षांकडे मागे फिरुन देवाच्या आपल्यावरील कृपेकडे पाहत असताना आम्हाला खुप आनंद वाटतो.

१० ऑगस्ट रोजी **एको ऑफ हिज कॉल** आणि त्याचे नानाविध कार्य ५६ व्या वर्षात पदार्पण करीत असताना आम्ही तुमच्यासह या सर्व वर्षांतील आपला प्रभु आणि तारणारा, येशू ख्रिस्त याने दिलेल्या विजया बद्दलचा आणि विश्वासहार्य ते बद्दलचा दिवस साजरा करणार आहोत. मनुष्यांच्या आणि देवाच्या नजरेतील आमच्या क्षुद्रता आकलन होऊन देखील, तुम्ही नखचता दर्शविलेल्या दयाळूपणाबद्दलचे मोल कळते आणि त्याबद्दल आम्ही आभारी आहोत. तुमच्या प्रार्थना, वेळोवेळी केलेली मदत आणि दिलेल्या आधार अतिशय प्रचंड असा वाटला.

माझी आग्रहाने प्रार्थना आहे; देवाने तुमच्यावर देखील स्वर्गाच्या खिडक्या उघडून आशीर्वादांची विपुल प्रमाणात वृष्टि करावी.

देवाची इच्छा, या वर्षी ५६व्या वर्धापन दिना निमित्ताने ९ ते ११ ऑगस्टच्या तीन दिवसात अत्यंत साध्या रितीने सुवार्ता सभा घेणार आहेत कार्यक्रमात आमच्या मुख्य मंडळीत सायंकाळी सुवार्ता सभा, तरुणांचे आणि लेकरांच्या कार्यक्रमांचा समावेश असणार. जर तुम्ही चेन्नाईला भेट देणार असाल, तर सभांमध्ये सहभागी होण्यास तुम्हाला आमंत्रण देत आहोत.

वर्धापन दीन साजरा मोठ्या प्रमाणात करण्यासाठी आमच्याकडे साधन संपत्ती नसल्यामुळे या दिवसात आमच्या विश्वसनीय स्वामी येशू ख्रिस्त याच्या वैभवाचा मोठषपणाचा संदेश देण्यासाठी आम्ही उपलब्ध स्रोतांचा उपयोग करुन घेण्याचे ठरविले आहे.

आम्ही आमच्या मिशनक्षेत्रांना भेट देण्यास सुरुवात केली आणि अलीकडेच गुजरात राज्यातील डुमदा आणि अकीरपाडा या दोन अतीशय दुर्गम अशा खेड्यानमध्ये २८ ते ३० जून २०२४ या दिवसात प्रवास केला. भारतात आणि भारतापलीकडे भेट देण्याची योजना आहे. आमच्या या प्रयत्नांसाठी तुमच्या प्रार्थना अपेक्षित आहेत.

देवाच्या कृपेद्वारे जेथे जेथे आम्ही जातो तेथे शुभवर्तमान प्रसार करणे, पुढाऱ्यांना शिक्षण देणे आणि मंडळी स्थापन करणे हे आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या गौरवार्थ सुरु ठेविले आहे.

आमची कुटुंबे निरनिराळ्या परिक्षा आणि मोह यांना सामोरे जात असताना देखील तुम्ही मागेपुढे न करता देत असलेल्या आधारा बद्दल आम्ही ऋणी आहोत. तुमच्या हातात हात मिळवून आम्ही पुढे जात आहोत. कृपया आमच्याबद्दल विचार करीत असा आणि देव तुमचे मार्गदर्शन करील तशी कृति करा. तुम्ही आमच्या अंत:करणात आहात आणि तुमच्यासाठी प्रार्थना करीत आहोत.

प्रीति आणि आशीर्वादांसहित,

येशू ख्रिस्त मध्ये तुमचे दास.


**पास्टर एस्. सॅम सेल्व राज आणि ॲलेक्स सॅमसन सॅम**
(+91) 9841271858/9841071858
E-mail : sam@echoofhiscall.org



Our Ministries: ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) YouTube Ministry Online Courses Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners St. Paul's Matriculation School Crusades Community Development

## त्याच्या बोलाविण्याचा प्रतिध्वनी मासिकाच्या वाचकांनो - लक्ष द्या

आमचे **एको ऑफ हिज कॉल** यूट्युब चॅनलवर आमचे ५ मिनिटांचे मननपर संदेश दररोज पहाटे २.०० वाजता तामिळ, तेलगू, इंग्रजी आणि हिन्दी या भाषांमध्ये प्रसारीत होत असतात. ते संदेश ऐकून तुम्ही देवाची कृपा प्राप्त करु शकता.

आणखी माझे मोबाईल क्रमांक ९८४१०७१८५८, आणि ९८४१२७१८५८ (वैयक्तिक) तुमच्या मोबाईलमध्ये जतन करुन ठेवा.

**- पास्टर एस्. सॅम सेल्वा राज**

(पान १ वरुन...)

ती आपल्या स्वत:ची करुन घेण्यासाठी धडपड होते.

आपल्या जीवनात देवाची अभिवचने व्यक्त होण्यास कदाचीत आठवडे, महिने, वर्षे किंवा दशके लागू शकतात. दाविदाला शमुवेलाने इस्त्राएलाचा राजा होण्याकरिता तेलाभ्यंग केल्यानंतर भविष्य वाणीच्या पूर्तते करिता १५ ते २० वर्षे वाट पहावी लागली. देव घाई करीत नाहि किंवा विलंबहि करीत नाही; तो त्याच्या ठरलेल्या वेळेनुसार कार्य करितो. त्याच्या ठरलेल्या वेळी तो कशा प्रकारे त्याची योजना प्रगट करितो ते पाहाण्यासाठी आपण धीराने वाट पाहिली पाहिजे. दाविदाला हे समजले, त्यामुळेच तो स्तोत्रांमध्ये वारंवार ''परमेश्वराची वाट पाहा'' अशी स्वत:स आठवण करुन देतो. दाविदाने हे बायबल मध्ये देवाच्या स्वभावगुणांविषयी केलेले वर्णन अद्वितीय असे आहे :- देव जो प्रार्थनांची उत्तरे देतो, अश्रु साठविणारा एक मेंढपाळ, आश्रयस्थान, आसरा, मार्गदर्शक, मित्र, माता, पिता, पती, साथी-सोबती, खडक, सावली त्याची हि नावे देवाचा त्याच्या जीवनातील अद्भूत अनुभव परिवर्तीत करितात. एक नाव जे माझ्या समोर येते, ते ''बाल-परासीम''जे २ शमुवेल ५:२० मध्ये सापडते. ज्याचा अर्थ तुटून पडण्याचे ठिकाण'' पाण्याच्या लोंढ्याप्रमाणे त्याच्या मार्गातील अडथळ मोडून काढीते, देव सर्व अडथळे मोडून काढील. हे गूढ असे सामर्थ्यशाली नाव आहे.

व्यक्तिला, व्यवसायला आणि घरांना दर्शनांनुसार नांव देणे हि प्रघात आहे. ज्यात विशिष्ट अर्थ आणि अधिकार असतो. नांव देताना देवाकडून शहाणपणा मागणे, कारण नांवामध्ये विशेष असा अभिषेक असतो. बायबलमध्ये नावाला गुढ असा अर्थ असाते.

### रेफाईमचे खोरे

'बाल परासीम' या नावाबद्दलची पार्श्वभूमी तुम्हाला सांगू द्या.

१ शमुवेल ५वा अध्याय, यात दावीदाला अभिषेककरून इस्त्राएलावर राजा नेमिले, तो त्याच्या जीवनातील खडतर काळ होता. देवाच्या चांगुलपणा आणि जीवनाच्या वृक्षाप्रमाणे असलेल्या जीवनाची पर्वा न करता. (नीतिसूत्रे १३:१२) दाविद तात्काळ आव्हानांना सामोरा गेला. सैतान, ज्याची प्रतिमा लबाड आणि गर्जणारा सिंह अशी आहे, त्याने दावीदाला बहाल केलेल्या आशीर्वादांना सुरुंग लावण्याच्या उद्देशाने त्याची शांति, सुख आणि आनंद हिरावून घेण्याचा प्रयत्न केला.

दाविदाला अभिषेक करुन इस्त्राएलाचा राजा केले आहे हे ऐकून सर्व पलिष्टी राक्षस संचार करीत असलेली युद्धभूमि प्रतिक असलेल्या रेफाईम खोऱ्यांत पसरले.

### १) देवाच्या योजनेच्या केंद्रस्थानी असणे. सैतानाच्या लक्षास-अवधानास आमंत्रीत करणार!

हि शत्रूद्वारे वापरलेली रणनीति देवाच्या इच्छेशी जोडलेले असताना होणारा विरोध प्रदर्शीत करतो. दाविदाने सामोर आलेला धोका ओळखुन घेऊन, युद्धात गुंतण्या अगोदर, देवाच्या योजनेवर त्यांचा भरवसा आहे. हे प्रदर्शीत करण्यास तो दैवी मार्गदर्शनाची याचना करितो.

घेरले गेल्याची आणि सापळ्यात अडकलो आहोत याची जाणीव असाताना, सैन्यांचा प्रभु हा सर्वव्यापी आहे हे लक्षात घेऊन उत्तेजीत व्हावे. शत्रूच्या बालेकिल्लाप्रमाणे असलेले रेफाईमचे खोरे हे देवाने विरोध्यांची वाहणाऱ्या पाण्याप्रमाणे दाणादाण केली आणि ते दैवी मध्यस्थिची जागा ठरले. हा विजय देवाची बाल-परासीम दिसत असलेला पराजय विजयानंदाच्या किर्ती दुरवर पसरविणारा अशी भूमिका अधारेखीत करतो.

प्रिय मित्रांनो, तुम्ही कसेही असा, कसल्याही परिस्थितीत असाल, मी तुम्हांस आनंदी, धीट आणि भक्कम रहाण्यास उत्तेजन देत आहे, कारण आपण फळी तोडणाऱ्या देवाची सेवा करणारे आहोत! तो आपल्यापुढे जाऊन आपल्या शत्रूचा पराभव करण्याचे अश्वासन देत आहे देवाने या क्षणाला पलिष्ट्यांवर दिलेला विजय हा वाखाणण्याजोगा आहे. सर्व अडखळणे पाण्याच्या लोंढ्याप्रमाणे दूर करण्यासारखा आहे! यामुळेच दाविदाने त्या स्थळास तुटून पडण्याचे ठिकाण असे नाव दिले.

प्रिय मित्रांनो, लक्षात ठेवा हे तुमचे तुटून पडण्याचे ठिकाण आहे! प्रार्थना करा, हक्क सांगा, कबूल करा आणि आत्म विश्वासाने जाहिर करा, हा माझा तुटून पडण्याचा मोसम आहे. बाल-परासिम माझ्या स्वत:च्या, माझ्या कुटुंबाच्या, माझ्या विवाहाच्या, माझ्या व्यवसायाच्या, माझ्या लेकरांच्या, माझ्या सेवाकार्याच्या विरोधात तयार केलेल्या शस्त्राचा नाश करील. तो ''तुटून पडणारा बाल-परासिम'' आहे. असे न डगमगणाऱ्या विश्वासाने मोठ्या आवाजात म्हणा. सध्या परिस्थितीवर लक्ष केंद्रित करु नका; देवाच्या योजनेवर भरोसा ठेवा. जसे इस्त्राएलांना यरीहोच्या

तटा भोवती सात दिवस फेरी मारणे युक्तिवादाला सोडून होते. आपण आपल्या समजबुद्धिवर अवलंबून राहू नये. मोशेला त्याच्या हातात असलेल्या काठी शिवाय इतर काही न घेता देव त्याच्या लोकांची सुटका करु शकेल यावर विश्वास ठेवण्यास अर्थ वाटला नसेल देव बाल-परासिम, तुमच्या पुढे जाऊन आपल्या शत्रूंवर विजय देईल अशा विश्वासाच्या नजरेने सर्व गोष्टिंकडे पाहा. अमेन!

### २) जेव्हा हल्ला होतो; तेव्हा देवाच्या सानिध्यात जा!

दबा धरुन बसलेली ठिकाणे समोर असताना आणि पाप चक्राच्या सापळ्यात अडकलेले असताना प्रगती गाठणे शक्य नसताना आपण त्यातून बाहेर पडण्यासाठी देवाच्या उपस्थितीत गेले पाहिजे. आपण शत्रूनी वेढले गेलो आहोत याची जाणीव होता क्षणी दाविदाने सल्याकरिता देवाकडे धाव घेतली. आपण पहिल्या अभिप्रायासाठी आपल्या समस्या देवाकडे आणतो काय? तुमचे कार्यक्रम थांबवून, तुमच्या बाले किल्ल्याकडे फिरा आणि आग्रहाने प्रार्थना करा. नम्रतेने त्याच्या समक्षतेत मागण्यास शोधण्यास, ठोकण्यास त्याच्या द्वारात जा. देवाचे नाव बळकट दुर्ग आहे; धार्मिक त्यात सुरक्षित असतात.

वेढले गेलेले असताना दाविद नम्रतेने गुडघे टेकून देवी इच्छा जाणून घेण्यासाठी प्रार्थना करितो. २ शमुवेल ५:१९ या वचनात असे लिहिलेले आहे, ''परमेश्वराने दाविदास म्हटले''. आपण प्रार्थना ऐकणाऱ्या आणि उधार देणाऱ्या देवाची उपासना करतो; परंतु आपले उद्देश त्याच प्रामाणिक असावा. समोरजाणे उत्सुकतेचे असावे. विजय प्राप्तिकरिता, लक्ष वेधणाऱ्या गोष्टि बाजूला सारुन, प्राथमिकते वर लक्ष केंद्रित करुन आणि न डगमगता त्याचे स्पष्ट उत्तर प्राप्त होई पर्यंत सतत मागत रहावे. परिस्थितीच्या गंभीरतेनुसार आपल्या प्रार्थना आग्रही असाव्यात. विश्वासणाऱ्याच्या समाजाबरोबर जवळीक असणे देखील महत्त्वाचे आहे.

### ३) रेफाईम खोऱ्यांतून बाल-परासीमकडे जाणे - एक परिवर्तनात्मक बदल!

पलिष्टि रेफाईमच्या खोऱ्यात दाविदाच्या विरोधात कटकारस्थान रचून त्याला निष्फळ करण्याकरिता दडून राहिले. चिन्हात्मक स्वरुपात रेफाईमचें खोरे सैतान स्वत: अडखळण, अपाय करण्यास आणि व्यक्तिच्या जीवनात त्यांच्या लेकरांसहित आणि पाचारण्यात अडथळा आणण्यासाठी निवडलेले स्थळ. काहीजणांस स्वत:स आपण या अपयशाच्या, पराभवाच्या आणि निराशेच्या खोऱ्यात असल्यासारखे वाटेल, ते खोरे जेथे त्यांचे विरोधक भितीने गर्भगळीत होतील शत्रूचे सिंहाच्या गर्जनेप्रमाणे असणारे अस्तित्व, देव विजयाचे खराब परिस्थिती बदलेल.

### बाल-परासीम

दाविदाने या स्थळाचे बाल-परासीम असे नाव पलिष्ट्यांच्या देवाच्या नावावरुन ठेविले. बाल, शत्रूचे वरकरणी बळ असलेल्या स्थानाच्या देवाने मधे पडून नाश केला असे दर्शविते. तो देवाचे शत्रूच्या बळकट दुर्गाच्या वर असलेले देवाचे सामर्थ्याची साक्ष देतो. देव आम्हांस विशेषकरुन आपल्या ज्या भागावर शत्रूची पकड आहे त्यामधून बाहेर काढू इच्छितो. दाविदाच्या उदाहरणाप्रमाणे, आपण बहुतेकदा आपल्या जीवनाकरिता असलेली देवाची योजना पूर्णपणे समजण्यात अपयशी ठरतो, कारण त्याचे आपल्या बदल्यात अदृष्य रितीने करीत असलेले कार्य समजण्यास असलेली आपली मर्यादा. देवाच्या विश्वासूपणावर भरोसा जीवनातील आव्हानात्मक युद्धभुमीवर देखील विजयाकडे नेतो.

देवाच्या दुताच्या सैन्याने ज्याप्रमाणे इस्त्राएल समुहाला बाहेर काढले. तुमच्या जीवनात ज्या मोठ्या विजयाची अनेक दिवस वाट पाहात होता. तो प्राप्त होण्याकरिता सक्रीयपणे कार्य करीत आहे. या तत्त्वाला फार महत्त्व आहे. कारण देव अतिशय शांतपणे घटना घडवून आणीत असतो; कदाचीत देवाने आपल्याला सोडून दिले आहे अशी चुकीची भावना होऊ शकते.

ख्रिस्तामधील माझ्या प्रिय बंधुंनो आणि बहिणींनो; ''हि माझी सुटकेची वेळ आहे. आजचा दिवस माझ्या विजयाची सुरुवात

(...पान ६ वर)


## निवासी बायबल कोर्स
### नेहम्या बायबल कॉलेज, चेन्नाई

माध्यम : हिंदी

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE REACHING NATIONS

आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५४ वर्षांपासून मान्यता प्राप्त

प्रवेशा करिता त्वरा करा!

**ईश्वरविद्या डिप्लोमा**

शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक

संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

※ ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे ※

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ ऑगस्ट ते १८ सप्टेंबर २०२४ पर्यंत

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✝ याकरीता देवाची स्तुती करा...

**१९ ऑगस्ट :** आमच्या **नहेम्या बायबल कॉलेज**च्या सर्व शिक्षक आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना आशीर्वाद दिल्याबद्दल.

**२० ऑगस्ट :** आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार, महान आज्ञापालनातील भागीदार या सर्वांवर असलेल्या दयेबद्दल.

**२१ ऑगस्ट :** आमचे **एको ऑफ हिज कॉल** मासिक सेवा समर्पीत असे सहसंपादक देवून आशीर्वादीत करीत असल्याबद्दल.

**२२ ऑगस्ट :** आपआपली जबाबदारी एक मनाने पार पाडीत असलेला कर्मचारी वर्ग पुरवून आशीर्वादीत केले.

**२३ ऑगस्ट :** **एको ऑफ हिज कॉल**च्या मासिक आणि शुभवर्तमान साहित्य छापण्याच्या सेवेकरिता प्लेट मेकर्स, प्लेट ग्राईंडर, शाई पुरविणारे, स्क्रिन प्रिंटर्सकडून प्राप्त हेत असलेल्या बाह्य आधाराबद्दल.

**२४ ऑगस्ट :** नैतिक आणि आर्थिक पाठबळ देणारे भागीदार देवून आशीर्वादीत केले आहे.

**२५ ऑगस्ट :** आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल**च्या प्रिन्सिपल, स्टाफ आणि विद्यार्थी यांना आशीर्वाद दिल्याबद्दल.

**२६ ऑगस्ट :** आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल, नहेम्या बायबल कॉलेज** आणि **पत्रव्यवहाराद्वारे** करण्यात येत असलेल्या **अभ्यासक्रमा**वर असलेल्या आशीर्वादाबद्दल.

**२७ ऑगस्ट :** मिशन क्षेत्रातील सेवकांच्या समर्पित सेवेबद्दल.

**२८ ऑगस्ट :** १० ऑगस्ट रोजी साजरा करण्यात आलेला ५६व्या वर्धापन दिन आशीर्वादीत केल्याबद्दल.

**२९ ऑगस्ट :** आमचे वरिष्ठ पाळक आणि त्यांच्या कुटुंबाची काळजी घेत असल्याबद्दल.

**३० ऑगस्ट :** रेव्ह. एस्. सॅम सेल्वाराज आणि त्यांच्या सघाद्वारे सुरत, गुजराथला दिलेल्या भेटीबद्दल.

**३१ ऑगस्ट :** मागील महिन्यातील सर्व गरजा पुरविल्याबद्दल.

**०१ सप्टेंबर :** आमच्या मंडळ्यांत सामील झालेल्या नवीन सभासदाबद्दल.

**०२ सप्टेंबर :** **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल**मध्ये झालेल्या नवीन प्रवेशाबद्दल.

**०३ सप्टेंबर :** आमच्या सर्व स्टाफ व त्यांच्या कुटुंबियांच्या सुरक्षितते बद्दल.

## ✝ कृपया यासाठी प्रार्थना करा...

**०४ सप्टेंबर :** आमचे वरिष्ठ पाळक एस्. सॅम सेल्वाराज यांना त्यांच्या विविध सेवा कार्याकरीता नवीन दिव्यदृष्टि देऊन आशीर्वादीत करावे.

**०५ सप्टेंबर :** **एको ऑफ हिज कॉल** मुख्य आणि शाखामंडळ्यांतील विश्वासणाऱ्यांच्या कल्याणासाठी.

**०६ सप्टेंबर :** सर्व ख्रिस्ती संस्था आणि मंडळ्यांच्या सुरक्षिततेकरीता आणि आशीर्वादाकरीता.

**०७ सप्टेंबर :** आमच्या सेवेच्या विस्ताराकरीता जागतिक सुवार्ता प्रसार कार्याकरीता.

**०८ सप्टेंबर :** ख्रिस्ती उपदेशकांनी भेसळ न करिता सुवार्ता संदेश द्यावा.

**०९ सप्टेंबर :** जागतिक ऐक्य आणि शांततेकरीता.

**१० सप्टेंबर :** मुद्रणालयातील मुद्रक, सहाय्यक मुद्रक आणि इतर कर्मचारी वर्गाकरीता.

**११ सप्टेंबर :** आमचे वरिष्ठ पाळक एस्. सॅम सेल्वाराज आणि त्यांच्या कुटुंबीय सर्व दुष्ट शक्तिपासून सुरक्षित असावे.

**१२ सप्टेंबर :** सेवेचे कार्यक्रम आणि त्यांच्या वाढीकरीता.

**१३ सप्टेंबर :** भारतातील शुभवर्तमान न पोहचलेल्या भागांत ते पोहचविणे शक्य व्हावे.

**१४ सप्टेंबर :** जगभरातील सर्व स्त्रिया व लेकरे यांच्या सुरक्षिततेसाठी.

**१५ सप्टेंबर :** सर्व दुष्कृत्ये करणारे आणि मद्याच्या व्यसनाधिन असणाऱ्यांनी पच्छाताप करावा व मुक्त व्हावे.

**१६ सप्टेंबर :** **नहेम्या बायबल कॉलेज**मध्ये आणखीन विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा.

**१७ सप्टेंबर :** आमच्या सर्व राज्य समन्वयकांच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या सुस्थितीसाठी.

**१८ सप्टेंबर :** देवाने या महिन्यांतील सर्व गरजा पुरवाव्यात.

(पान ४ वरुन)

आहे.'' असे धीटपणे जाहिर करा. ज्याप्रमाणे देवाने दाविदाकरिता रेफाईम खोऱ्याचा परासीम मध्ये बदल घडवून आणला, आज तसाच बदल आपल्या प्रत्येकाच्या जीवनात घडवून आणण्यासाठी तो उभा आहे.

२ शमुवेल ५:२१ आपल्याला पहावयास मिळते, **''पलिष्टी तेथे आपल्या मूर्ति टाकून गेले; त्या दाविदाने व त्याच्या लोकांनी नेल्या.''**

मी प्रार्थना करितो की देवाने तुमच्या पुढे जाऊन, तुमचे धडपडीचे खोऱ्याचे विपुल आशीर्वादात रुपांतर करुन शत्रूने जे काहि मागे सोडीले आहे. त्या सर्वांचा नाश करण्यास सामर्थ्य द्यावे. लक्षात ठेवा जेव्हा तुम्ही शत्रुच्या निर्दयी हृदयात सापडलेले असता, हिम्मत धरा, कारण तुम्ही योग्य ठिकाणी आहात – देव तुमच्या जीवनात आश्चर्यकारक कार्य करीत आहे.

देवाच्या मध्ये पडण्यामुळे आपले शत्रू मागे फिरण्याच्या स्थितीत आहेत. दाविदाच्या सैनिकांनी त्यांना विरोध करणाऱ्या सर्वांना आग लावली सर्वांची राखरांगोळी केली.

*********

# ''परमेश्वर भल्यांच्या बरोबर असणार'' (२ इतिहास ११:११)

(पास्टर एस्. सॅम सेल्वाराज यांनी मंडळीला दिलेला संदेश)

बहुतेकदा विश्वास किंवा निष्ठावान जीवन जगण्याचा मोबदला बाह्यरित्या दिसत नाही. व्यर्थतेचे आणि लबाडीचे जीवन जगत असलेले लोक आपणास उत्कर्ष पावलेले पाहवयास मिळतात. त्यामुळे मनात विचार येऊ शकतो, विश्वास किंवा निष्ठावान जीवन जगण्यात काय उपयोग? ''परंतु जस जसे दिवस सरत जातात; जे विश्वासू किंवा निष्ठावान आहेत त्यांना विपुल दैवी मदत प्राप्त होते.'' **''स्थिर मनाच्या मनुष्याला आशीर्वादांची रेलचेल होते.''** (नीतिसूत्रे २८:२०)

१) देव तात्काळ त्यांची प्रार्थना ऐकेल.

२) देव त्याचे अर्ज-विनंत्यास मान्य करील.

३) ते संकटात - धोक्यात असतील तेव्हा प्रभुचे दूत नेहमीच त्यांना मदत करण्यास सिद्ध असतील.

हिज्कीया राजा देवासमोर नीतिमान होता. **''इस्राएलाचा देव परमेश्वर याजवर त्याचा भाव असे. त्याच्या मागून यहुदाच्या सर्व राजामध्ये त्याच्या तोडीचा कोणी होऊन गेला नाही व त्याच्यापूर्वीहि झाला नाही. तो परमेश्वराला धरुन राहिला. त्याला अनुसरण्याचे त्याने सोडिले नाही; परमेश्वराने मोशाला ज्या आज्ञाविहित केल्या होत्या त्या त्याने पाळिल्या. यास्तव परमेश्वर त्याच्या बरोबर होता; जिकडे जिकडे तो जाईल तिकडेतिकडे त्यास यश प्राप्ति होईल.''** (२ राजे १८:५-७).

२ राजे अध्याय २० मध्ये आपणास तोच राजा गंभीर आजारी झालेला दिसतो. त्याने आपले तोंड भिंतीकडे फिरवून परमेश्वराची प्रार्थना केली, **''हे परमेश्वरा मी तुझ्यासमोर सत्यतेने व सात्विक मनाने वागलो आहे आणि तुझ्या दृष्टिने जे योग्य तेंच करीत आलो आहे ह्याचे स्मरण कर.''** (२ राजे २०:३).

यापूर्वी आम्ही आमचे मासिक ख्रिस्ती मुद्रणालयात छापत होतो. एकदा त्या मुद्रणालयातील पर्यवेक्षक मला म्हणाला, ''पास्टर, आम्ही जेव्हा जगिक-विधर्मी लोकांकडून छपाईचे काम स्विकारतो त्यांच्याकडून पैसे मिळण्याची खात्री असते. परंतु देवाच्या सेवकांसाठी एखादे काम करतो; तेव्हा त्यांच्याकडून पैसे मिळणे फारच कठीण असते. त्यांच्याकडे पैसे असताना देखील त्यांना देण्याची इच्छा नसते. मला आश्चर्य वाटते; ते देवाकरिता कसे काम करितात!''

बायबलमध्ये आपल्याला ''विश्वासू'' आणि सचोटीने वर्तणारे, लोक पाहावयास मिळतात ''विश्वासू असणे'' आणि ''चांगले असणे'' यात जवळचा संबंध आहे. २ इतिहास १९:११ या वचनात वाचा....

**''परमेश्वर भल्यांच्या बरोबर असणार.''** स्तोत्र १५:१,२ **''...जो सात्विकतेने चालतो व नीतीनें वागतो. तो पवित्र डोंगरावर राहिल.''** २ इतिहास १६:९. **''परमेश्वराचे नेत्र अखिल पृथ्वीचें निरीक्षण करीत असतात, जे कोणी सात्विक चित्तानें त्याच्याशी जे कोणी सात्विक चित्ताने त्याच्याशी वर्ततात त्यांचे साहाय्य करण्यात तो आपले**

(...पान ८ वर)

नहेम्या बाईबल निवासी कॉलेज

वेलाचेरी आणि चेपॉक संतोषपुरम

माध्यम : तमिळ

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE REACHING NATIONS

आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५४ वर्षांपासून मान्यता प्राप्त

प्रवेशा करिता त्वरा करा !

ईश्वरविद्या डिप्लोमा

शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक

संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

## कृपया आमच्या मुख्यालयातील सेवाकार्याकरिता प्रार्थना करा

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. बायबलकोर : पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम : इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी
३. एको ऑफ हिज कॉल : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
४. नहेम्या बायबल कॉलेज (दोन केंद्र) (सायंकालीन / निवासी)
५. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
६. महान आजापालनाचे भागीदार (पाळकांचे नेटवर्क)
७. प्रशिक्षण कार्यक्रम
८. महासभा
९. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
१०. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
११. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१२. शब्बाथ शाळा : सकाळी ८.३० आणि सायंकाळी ४ वाजता - रविवारी
**१३. तामिळ उपासना : सकाळी ८.०० आणि १०,०० वाजता - रविवारी**
**१४. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**१५. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**१६. इंग्रजी आणि तामिळ उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
१७. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
१८. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
१९. शिष्यत्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२०. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२१. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२२. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार
२३. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
२४. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शुक्रवार
२५. उपास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शनिवार
२६. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
२७. सकाळचे मनन : पहाटे ५ वाजता - दररोज
२८. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
२९. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST |
| Account Number | : | 1023 2923 805 |
| Bank Name | : | STATE BANK OF INDIA |
| Branch | : | TRIPLICANE, CHENNAI - 600 005 |
| IFSC Code | : | SBIN 0000249 |
| SWIFT Code | : | SBI NIN BB 455 |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

**''...परमेश्वराची आशा धरुन राहणारे नवीन शक्ति संपादन करितील,... चालतील तरी थकणार नाहीत.'' (यशया ४०:३१)**

१९७२ सालातील अगदी सुरुवातीच्या दिवसात पवित्र आत्माने मी चेन्नाईमधील सईदापेट येथे सुवार्ता सभा आयोजीत करावी यासाठी मला उद्युक्त केले. या सभांना लोकांनी यावे यासाठी आम्ही रस्त्यावर फलक लावून, हस्त पत्रीका वाटण्या द्वारे आमंत्रीत केले. मी, माझ्या सहकाऱ्यांसह लोकांना सभेकरिता आणण्याकरिता जीतके होईल तितके प्रयत्न केले.

केवळ या सभांकरिता पुष्कळशा प्रार्थना करण्यात आल्या. माझ्या कांही मित्रांनी त्यांची वाद्ये आणि गाण्याच्या छापील पत्रिका आणल्या. सभेला सुरु होण्याची वेळ आली तरी सभेसाठी कोणीही येत असलेले दिसत नव्हते. आम्ही पुष्कळ वेळ वाट पहात होतो. सरते शेवटी दोन बंधु सभेमध्ये सहभागी होण्यासाठी आले. माझे सर्व मित्र, ज्यांनी सभेकरिता श्रम घेतले होते, नाराज झाले. त्यांनी मला विचारीले, देवाने आपला प्रामाणीकपणे केलेल्या प्रार्थना देवाने कां ऐकल्या नाहीत. आणि आपल्याश्रमाचा मान राखीला नाही? मी त्यांना म्हणालो, देव त्याच्या पद्धतीने उत्तर देईल. मी आशा सोडीली नाही. **मी परमेश्वर याजवर भिस्त ठेवून खंबीर राहिलो.** (१ शमुवेल ३०:६)

तथापी, त्या दोन जणा बरोबर आम्ही सभा घेतली, सामर्थ्यशाली संदेश दिला आणि परिणामी दोघांतील एकाने त्याचे जीवन प्रभुला समर्पित केले आणि कालांतराने तो मजबरोबर सेवा करु लागला.

आता देवाने मला भारतात आणि भारता बाहेर देखील हजारो लोकांच्या सभांमध्ये संदेश देण्यासाठी तयार केले आहे. देवाचे नव गौरविले जात आहे. हे घडून येण्याकरिता मला अनेक वर्षे धीराने आणि विश्वासाने वाट पहावी लागली.

प्रिय बंधुनो आणि बहिणींनो तुम्ही अपयशाच्या नावेत प्रवास करीत आहात कां? तुमच्या सर्व श्रमास उपास-प्रार्थनांना फळ येत नाही असे तुम्हास वाटते आहे कां? कधी कधी आपण जलद मोठ्या अपेक्षा सहित अतिशय सक्रीय असतो तेव्हा देव त्याच्या प्रती असलेल्या विश्वासाची आणि धीर यांची परिक्षा घेण्यासाठी स्तब्ध असतो.

**''नाश होणाऱ्या सोन्याची परीक्षा अग्नीनें करितत, त्या सोन्यापेक्षा मूल्यवान असे जे तुमच्या विश्वासाचे परिक्षेत उतरणे त्यापासून प्रशंसा, गौरव व मान, ही फळे येशू ख्रिस्ताच्या प्रकट होण्याच्या वेळेस मिळावी.''** (१ पेत्र १:७)

देव तुम्हा सर्वांना आशीर्वाद देवो.

(पान ६ वरुन...)

**सामर्थ्य प्रगट करतो.''**, लुक १:१७. ''**...देवाला योग्य प्रजा हवी आहे**'', नीति २:७. ''**सात्विकपणे चालणाऱ्यास तो ढाल आहे**'', उत्पत्ति १७:१. ''**...मी सर्व समर्थ देव आहे; तू माझ्यासमोर आहेस हे मनात वागवून चाल व सात्विक राहा.**'' ईयोब १:८. ''**परमेश्वराने सैतानास विचारिले; माझा सेवक ईयोब याच्याकडे तुझे लक्ष गेले आहे काय? भूतलावर त्याच्या तोडीचा सात्त्विक, सरळ, देवाला भिऊन वागणारा व पापापासून दूर राहणारा असा दुसरा कोणी नाही.**''

''**तेव्हा त्याची स्त्री त्याला म्हणाली तुम्ही अजून सत्व धरुन राहिला आहा काय? देवाचे नांव सोडून द्या आणि मरून जा.**'' (ईयोब २:९.) ''**मला तर तूं माझ्या सात्विकपणात स्थिर राखितोस, मला तूं आपल्या सन्मुख सर्वकाळ ठेवितोस.**'' (ईयोब ४१:१२.) ''**...माझा खरा विश्वासपुत्र तीमथ्य याला.**'' (१ तिमोथी पत्र १:१).

प्रथमत: नोहा त्याच्या पीढीत एकटाच बाजूला केलेला असणार आपण देखील देवाने आपल्याला आपल्या दुष्ट पीढीत सात्विकपणे एकटे उभे ठेविल्याबद्दल त्याचे आभार मानिले पाहिजेत. देव आपल्या प्रत्येकाला वेगवेगळे कौशल्य, वेगळा आवाज, कृपा आणि सध्या देतो. मी माझ्या खोलीत एकटा असतो तेव्हा प्रार्थना करितो, ''देवा, तू मज सोबत आहेस त्याबद्दल तुझी स्तुती करितो. तू मजसोबत नसता तर मी या सर्व गोष्टि करु शकलो नसतो. त्याच्या दैवी शक्ति आणि अभिषेकामुळे आपण अशा मोठ्या गोष्टि करु शकतो. आपल्याला आरोग्य प्राप्त होते. देवाला नोहा, त्याच्या दुष्ट पीढीत सात्विक असा दिसला. तद्वतच, आपण देखील सात्विक राहून द्या सोबत चालण्याचा आनंद उपभोग या.''

आपण जेव्हा लोभी नसतो, सर्व व्यवहारात प्रामाणीक आणि सदैव देवाचे भय असते, देव आपल्या सोबत चालतो. एकटे असताना देवाचे अस्तित्व आपल्याला जाणवते.

दुसरे म्हणजे, देवाने नोहाला बोलाविले आणि तारु बांधण्यास सांगितले. अनेकजण म्हणतात, ''देवाने मला एकट्याला बोलवू द्या आणि वैयक्तिक रित्या सांगू या. तेव्हा मी त्याची आज्ञा मानीन.'' देवा जर आपल्याशी बोलावे असे वाटत असल्यास आपले कान

ऐकण्यास तीक्ष्ण आणि अंत:करण स्वच्छ आणि खुले असावे. आपण जेव्हा जगात फसवणूक आणि लबाडी यात गुंतलेलो असतो आणि सद्सद्विवेक डागाळलेला असतो, देव आम्हाला कधीही अभिषेक करणार नाहि किंवा आमच्याशी बोलणार नाहि. देवाच्या लेकराप्रमाणे जगलो असू, तर त्याची वाणी ऐकू शकू. जर देवाचे भय बाळगून सात्विक जीवन जगू. तर तो आमचे सर्व रोग, समस्या आणि दु:खे काढून टाकील आणि त्याची वाणी ऐकणे शक्य होऊ दोईल.

माझ्या जीवनात मी तीन वेळा अतिशय स्पष्ट अशा रितीने देवाचा आवाज ऐकला आहे. तो अतिशय मधुर असा आवाज आहे. एकदा तर माझ्या नांवाने त्याने मला हाक मारीलेली मी ऐकली आहे. दुसऱ्या वेळी त्याने सेवेकरिता मला बोलाविले. तिसऱ्या वेळी मी आजारी असताना, त्याने मला अभिवचन दिले. हे सर्व अनुभव सुरक्षित ठेवणे कठीण आहे.

''देवाच्या प्रिय लेकरांनो, तुम्ही केलेली चांगली कामे आणि दानधर्मे त्याने विसरावी एवढा तो अन्यायी नाही.'' (इब्री ६:१०) तो नीतिमान देव आहे. त्याज समोर सात्विक आहात आणि योग्य व्यक्ति ठरला, तर निश्चितच तो तुमच्या सोबत चालणार त्याची वाणी देखील ऐकू शकाल. या सर्वांहून अधीक, त्याची इच्छा पूर्ण करण्याकरिता तो तुम्हाला कृपा पुरविल.

देवाचे आशीर्वाद आपल्या त्याच्या सेवेमध्ये असलेल्या समर्पितपणावर आणि जबाबदारिवर अवलंबून असतात आणि निश्चितच त्याची वाणी आपण ऐकू शकतो.

तिसरे म्हणजे, नोहाला देवाकडून एक काम देखील मिळाले. आपण देवाकडून हुकूम प्राप्त न झालेले असे दास राहू नये. तुम्ही जे पूर्णपणे त्याला अधीन होता; देव तुमच्या सोबत चालत आहे असे पहावयास मिळते. आपण त्याच्या कृपेत आणि प्रीतित नसल्यामुळे त्याचे कार्य परिणामकारक रित्या करण्यात अपयशी ठरतो. जेव्हा स्वेच्छेनुसार काहि गोष्टि करितो, तेव्हा अपयश पदरात पडते. परंतु देवाच्या इच्छेमध्ये राहून कार्य करतो, आपल्या मोठ्या प्रमाणात बळ प्राप्त होते.

त्यानंतर, देव आपल्याला योग्य ठरवितो तेव्हा आपणात कौशल्य येते. आपल्या कामात देखील तो आपल्याला मोबदला देतो. ''माझ्या मुलाने देवाची सेवा स्विकारली आहे. मला विचार येते, तो कसा काय जीवन जगणार''. असे शब्द काही पाळकांनी उच्चारिलेले ऐकले असतील. देवराज्याकरिता कार्य करणारे जे, ते जगातील सर्वात महान व्यक्ति असतात. देव त्यांना आशीर्वाद देवू इच्छितो. नोहा देखील देवाने त्याला दिलेले सर्व काम पूर्ण करू शकला.

अनेकवेळा, देवाने दिलेली योजना आपणांस स्विकारता येणे शक्य होत नाही. आपल्या शक्यतेपलिकडे ती असल्यास आपल्याला आश्चर्य वाटते. आपण जे करावे असे त्याला वाटते ते आपण प्रत्येकाने करावे अशी त्याची अपेक्षा असते. आपण अगदि काटेकोरपणे तो आम्हास सांगतो ते करावे, मग ते कोणतेही काम असो.

शेवटी आपण वाचतो, **''नोहाने देवाने त्याला जे काही सांगितले ते त्याने केले.''** (उत्पति ६:२२) देव त्याने सुरू केलेले सर्व पूर्ण करितो. तुमच्या जीवनात त्याने जे काही सुरू केले, ते तो पूर्णत्वास नेईल. ज्या उद्देशाने त्याने तुम्हांस पाचारण केले, तो उद्देश निश्चितपणे पूर्ण करील. तुम्ही केवळ नेहमी **देवाचे भय बाळगण्यास स्वत:स बदलावे.** देवाच्या दृष्टिसमोर विश्वासू असा अनेकांना खरे बोलावेसे वाटते. परंतु त्या आधी ते खोटे बोलतात. देव लबाडी करणाऱ्यांचा उपयोग करुन घेणार नाही. तुम्ही स्वत:स लोभ नसणारे अशा लोकांत बदला. लोभाचा द्वेष करण्याचा प्रयत्न करा.

**''...परमेश्वर भल्यांच्या बरोबर असणार.''** (२ इतिहास १९:११)

*********

We're HIRING

Qualified, Expeienced & Mission Minded Candidates for

Medavakkam

ST. PAUL'S MATRICULATION SCHOOL :

❖ PRINCIPAL

❖ TEACHERS (Social Science, KG etc.,)

for Head Office @ CHEPAUK :

❖ DTP OPERATORS

❖ COMPUTER OPERATORS (with Typing)

❖ DRIVERS

E.mail : samselvaraj333@gmail.com

✆ 97908 05460 / 044- 2852 8282

## वाचकांनो लक्ष द्या!

### पास्टर एस्. सॅम सेल्वा राज यांची आत्मचरित्र

पास्टर एस्. सॅम सेल्वा राज यांच्या आत्मचरित्र पुस्तक स्वरूपात छापण्याच्या अंतिम टप्प्यात आहोत. **त्यांच्या सेवेचा तुमच्या जीवनावर कसा प्रभाव पडला याविषयी आम्ही तुमच्याकडून दहा ओळींची साक्ष अपेक्षित आहोत. त्यासोबत आत्मचरित्रात तुमचा फोटो छापण्यात आम्हाला आवडेल.**

- संपादक

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## Echo of His Call

**YouTube**
**Please subscribe**

Kindly view and subscribe our **Echo of His Call YouTube Channel** when you get time. Thanks.
**- Editor**

## OUR BANK DETAILS:

***1. Bank : State Bank of India***

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

***2. Bank : ICICI Bank***

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

***3. Bank : State Bank of India***

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-     आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel" on 12th AUGUST 2024**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**